Navgan Shikshan Sanstha Rajuri (N)

# Mrs.Kesharbai Sonajirao Kshirsagar Alias Kaku Arts, Science and Commerce College, Beed-431122

NAAC Reaccredited 'A+' CGPA (3.18)

## Department of History and Icons and Sculptures Research Foundation, Aurangabad

**Organized Two days 3rd Annual National Conference on Sculpture, Art and Architecture**



## CERTIFICATE



This is to certify that, Mr./Mrs./Dr. GAUTAM DHANAJI RAJGURU of Dada Patil Mahavidyalaya, karjat has participated/Presented research paper entitled Shivpattan (Khorda) killa in Two days National Conference Organized by Department of History and Icons & Sculptures Research Foundation on the theme **Sculpture, Art and Architecture on 10 & 11 Feb. 2023 at Mrs. Kesharbai Sonajirao Kshirsagar Alias Kaku Arts, Sci. & Commerce College, Beed.**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr.Anita V.Shinde<br>Convener<br>Department of History | Dr.Sanjay Paikarao<br>Secretary<br>Icons Sculptures Research Foundation | Dr.Zaker Pathan<br>President<br>Icons Sculptures Research Foundation | Dr.Shivnand V. Kshirsagar<br>I/c Principal<br>Mrs.K.S.K. College, Beed |

Scanned with CamScanner

CamScanner

International Registered and Recognized Research Journal
Related to Higher Education for all subjects

ISSN : 2277-7423

Special Issue
Impact Factor : 0.4521 (UIF)

# INSIGHT

## Research Analyasis

**सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू**
**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड**

व

**मूर्ती व शिल्प संशोधन संस्था, औरंगाबाद**

यांच्या संयुक्त विद्यमाने

**दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन**

# "Sculpture, Art and Architecture"

१० व ११ फेब्रुवारी २०२३



☆ आयोजक ☆

**इतिहास विभाग**

**सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बीड**

Scanned with CamScanner

CamScanner

# अनुक्रमणिका


| Sr.No. | Paper Name | Page No. |
|---|---|---|
| 1. | गुंफावास्तुकला आणि शिल्पकला<br>डॉ. अनिता शिंदे | 1-7 |
| 2. | कोल्हापुरातील तथागतांच्या आस्थियांवरील नामशेष स्तूप<br>धम्मपाल माशाळकर | 8-11 |
| 3. | नेवासा येथील शालभंजिका<br>डॉ. संजय पाईकराव | 12-13 |
| 4. | अन्वा येथील महादेव मंदिरावर अंकितविभव विष्णूंच्या वैष्णव शक्ती देवतांचा परिचय<br>श्री. मयुरेश खडके | 14-23 |
| 5. | स्थापत्यशास्त्राचा व वास्तुशास्त्रचा उत्कृष्ट नमुना–दौलताबाद किल्ला<br>दादासाहेब जगन्नाथ कांबळे, डॉ. किरण प्रकाश काळे | 24-27 |
| 6. | तारापूर आणि कासेगांव येथील हेमाडपंथी मंदिराच्या वितानावरील अष्टदिक्पाल जतन आणि संरक्षण<br>डॉ. सुवर्णा पाटील | 28-33 |
| 7. | ऐतिहासिक काळातील नाग शिल्पकलाआणि नागघराणे : एक अभ्यास<br>डॉ.विवेकानंद लक्ष्मन चव्हाण | 34-46 |
| 8. | निलंगा तालुक्यातील भुतमुगळी येथील महादेव मंदिर व शिल्प वैभव<br>डॉ. दामाजीवाले एम. डी., डॉ. व्यंकट काशीनाथराव कदम | 47-51 |
| 9. | मोगल लघुचित्रशैली<br>लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 52-55 |




CamScanner

| | | |
|---|---|---|
| 10. | वेरुळचे कैलास मंदीर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना<br>प्रा.डॉ.निलय देशमुख | 56-59 |
| 11. | शिवपट्टण (खडा) किल्ला<br>श्री. राजगुरू गौतम धनाजी | 60-65 |
| 12. | वेरुळचे कैलास मंदीर शिल्पकलचो उत्कृष्ट नमनुा<br>प्रा.डॉ.निलय देशमुख | 66-68 |
| 13. | ऐतिहासिक वारसा लाभलेले बेंबळी गावातील 'वीरगळ'<br>भोसले धनाजी दलितराव, प्रोफेसर डा. गव्हाणे किशोरकुमार गोवर्धन | 69-73 |
| 14. | वर्णे, पळसदरी, ता. कर्जत, जिल्हा. रायगड येथील अपरिचित बौद्ध लेणी<br>रोहित राजेंद्र भोसले | 74-77 |
| 15. | कंधार येथील बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वर मूर्ती<br>प्रा. डॉ. विजया साखरे | 78-81 |
| 16. | उदगीर येथील मंदिरे- एक ऐतिहासिक अभ्यास<br>डॉ. मारोती पोमा चव्हाण | 82-90 |
| 17. | "डॉ.एम.के.ढवळीकरांच्या इतिहासलेखनातील प्राचीन भारतीय धार्मीक जीवन"<br>प्रा.डॉ.एस.के कमळकर | 91-94 |
| 18. | बौद्ध मूर्तिकलेत सम्राट कनिष्कचे योगदान<br>कृष्णा अर्जुन गावित | 95-100 |
| 19. | माहूरची लेणी शिल्पे<br>प्रा. डॉ. जाधव दत्ता उध्दव | 101-106 |
| 20. | A Historical Study of temples at Chandol<br>Dr. Shyam Prakash Deokar | 107-110 |
| 21. | The Cultural Heritage of Indian Art and Architecture<br>Dr.Vithal Baburao Gunde , Dr.Prakash Babarao | 111-113 |

# शिवपट्टण (खर्डा) किल्ला

श्री. राजगुरू गौतम धनाजी
पीएच.डी. संशोधक
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत, अहमदनगर

इतिहास अध्ययनात साधनांना महत्त्वाचे स्थान आहे. या साधनांमध्ये प्राथमिक साधने हि महत्त्वपूर्ण व अस्सल समजले जातात. प्राथमिक साधने हि लिखित किंवा भौतिक स्वरूपात असतात त्यापैकी किल्ला हे प्राचीन व मध्ययुगीन इतिहास लेखनाचे महत्त्वपूर्ण असे प्राथमिक साधन आहे. या साधनाच्या आधारे आपणास तत्कालीन राजकीय, सांस्कृतिक ,सामरिक व स्थापत्य विषयक महत्त्वपूर्ण माहिती ज्ञात होण्यास मदत होते.

किल्ला म्हणजे संरक्षणात्मक तटबंदीयुक्त स्थापत्य होय. तसेच आपल्या राज्याचे किंवा प्रदेशाचे शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी त्याचप्रमाणे सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण मिळवण्यासाठी बांधलेल्या वास्तुस किल्ला असे म्हणतात.

किल्ला या स्थापत्य प्रकाराचे अवशेष व संदर्भ आपणास अगदी प्राचीन कालखंडापासूनचे मिळतात हडप्पा, मौर्यकालीन,यादवकालीन, सल्तनतकालीन, मोगलकालीन व मराठेकालीन किल्ला स्थापत्याचे अवशेष आजही आपणास पहावयास मिळतात तसेच प्राचीन वेद साहित्य, स्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र, आज्ञापत्र इत्यादी ग्रंथांमध्ये किल्ला स्थापत्य प्रकाराविषयी विषयी लिखित स्वरूपात उल्लेख मिळतात. किल्ला या स्थापत्यप्रकाराचे प्रामुख्याने त्याच्या स्थानावरून दुर्ग, गड व भुईकोट असे तीन प्रमुख प्रकार पडतात. या तीन प्रकारापैकी भुईकोट या किल्ला प्रकारात खर्ड्याच्या किल्ल्याचा समावेश होतो.

**खर्डा किल्ला-**

खर्डा या किल्ल्याचे मूळ नाव हे शिवपट्टण असे आहे परंतु हा किल्ला खर्डा या गावाच्या नावाने प्रसिद्ध आहे. हा किल्ला अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात खर्डा या गावात पूर्वेस वालाघाटाच्या टेकडीवर आहे. हा किल्ला जामखेड



CS CamScanner

या तालुक्याच्या स्थानापासून नैऋत्य दिशेस भूम मार्गावर २३ किलोमीटर अंतरावर आहे.या किल्ल्याची स्थापना निजाम सरदार सुलतानराजे आप्पासाहेब निंबाळकर यांनी संरक्षणात्मक दृष्टिकोनातून केली आहे.

सुलतानराजे आप्पासाहेब निंबाळकर यांच्या पूर्वजांनी मोगल, निजामशाही, आदिलशाही व मराठी दरबारात आपली तलवार गाजवली होती. निंबाळकर घराणे यांनी मराठा स्वराज्यात सरदार म्हणून पराक्रम गाजवला होता. परंतु शाहू महाराजांच्या काळात मराठ्यांच्या दरबारात मराठा सरदारांचे महत्त्व कमी झाले तसेच अंतर्गत संघर्षामुळे मराठ्यांची सरदारकी सोडून हैदराबादच्या निजामाला जाऊन मिळाले व त्यांना निजामाने सप्तहजार मनसब देऊन बीड, अंबर,धारूर आणि पाथरीची जहागीर दिली याच जहागिरीत कौतुका या स्थानिक नदीच्या तीरावर शिवपट्टणम या किल्ल्याची उभारणे १७४३ ला केली ते शिवभक्त असल्यामुळे त्यांनी या किल्ल्याला शिवपट्टण असे नाव दिले. परंतु हा किल्ला खर्डा या गावाच्या नावानेच अधिक ओळखला जातो.मध्ययुगीन महत्त्वाच्या व्यापारी मार्गावरील खर्डा हे कसब्याचे गाव होते. या कसब्यातून बीड, अहमदनगर, उस्मानाबाद आणि सोलापूर या नगरांशी व्यापार चालत होता. या कसब्यात देवांग कोष्टी समाज बहुसंख्या असल्यामुळे येथील लोकांचा व्यवसाय हातमागाचा होता मध्यकाळात येथील विणलेली साडी प्रसिद्ध होते.

खर्डा हा किल्ला बालाघाट डोंगर रांगेत खर्डा या गावाच्या पूर्वेला असणाऱ्या टेकडीवर स्थापन केलेला आहे. या किल्ल्याचा आकार हा चौरसाकृती आहे. या किल्ल्याच्या बाहेरून खंडक असून तटबंदी ही भक्कम आहे या तटबंदीत सहा भक्कम बुरुज आहेत. या किल्ल्याचे मुख्य प्रवास द्वारे उत्तर दिशेस असून ते दोन बुरजांच्या दरम्यान असून सहजासहजी दिसून येत नाही. या मुख्य प्रवेशद्वारावरच पारशी लिपीतील शिलालेख आहे. या शिलालेखातील मजकूर पुढील प्रमाणे आहेत -

" उत्तम व गुणवान अमीर व साहेब मर्द राजा सुलतानजी निंबाळकर देशमुख देशपांडे मुकदम महाराज शेटे वगैरे कसबे शिवपट्टण पर गणेश जामखेड सरकार



CS CamScanner

अहमदनगर यांचे कार्यरत किल्ला सुलतानदुर्ग कसबे मजकूर ची हद्द तारीख २५ माहे शावास सन ११४६ वर्गम आहे हिजरी ११५६मध्ये तयार झाला"

या शिलालेखातील मजकुराच्या माध्यमातून शिवपट्टणम किल्ला सुलतान राजे निंबाळकर यांनी इ.स.१७४३मध्ये बांधल्याचे समजते या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे. मराठी निजाम यांच्यात इ.स.१७९५ साली झालेल्या खर्डा लढाईत निजामाने या शिवपट्टण या किल्ल्यात आश्रय घेतला होता तसेच या किल्ल्याने मराठा- निजाम खर्डा लढाईच्या तहाचा साक्षीदार आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढाईत व मराठवाडा मुक्ती संग्रामात या किल्ल्याने स्वतंत्र सैनिकांना आश्रय दिलेला आहे.

**खर्डा किल्ल्यातील स्थापन**

**१.प्रवेशद्वारे -** किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वारे हे उत्तरमुखी असून भक्कम अशा दोन बुरुजांच्या दरम्यान आहे. याच प्रवेशद्वारावर पारशी भाषेतील शिलालेख कोरलेला आहे. या शिलालेखाच्या माध्यमातून आपणास किल्ला कोणी व कधी बांधला याविषयी महत्वाची माहिती मिळते. हे प्रवेशद्वार कमनाकार असून प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूला प्रवेशद्वार बंद करण्यासाठी व्यवस्था केलेली दिसून येते. या प्रवेशद्वाराच्या आज प्रवेश केल्या असता दुसरे प्रवेशद्वारे पूर्व मुख्य असून या प्रवेशद्वाराला लागूनच डाव्या बाजूने तटबंदीवर जाण्यास दगडी पायऱ्या आहेत. दुसरे प्रवेशद्वार भक्कम असे असून या प्रवेशद्वारावर मराठी भाषेतील शिलालेख आहे. हे प्रवेशद्वार देखील कमनाकार आहे या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंनी देवळी आहेत. या दुसऱ्या प्रवेशद्वारातून आत किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर समोर तीन ओवाऱ्या दिसतात त्यांचे छत हे घुमटाकार आहे.

**२. मशीद -** किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर नजरेस पडणारी महत्त्वाची वास्तू म्हणजे मशीद ही मशीद तीस फूट लांब व पंधरा फूट रुंद असून ती भक्कम अशा दगडी पायावर उभारलेली आहे. ही मशीन घडीव दगडांच्या माध्यमातून तयार केलेली असून मशिदीचा बांधकामावर विटांच्या बांधकामाचे अवशेषही दिसतात. या मशिदीवर फारशी लिपीतील शिलालेख आहे. या शिलालेखाच्या माध्यमातून